# वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी





पायरेट ढेकूण किंवा फुलातील ढेकूण

फुलकिडे, मावा, तुडतुडे, पांढरी माशी, कोळी, किडींची अंडी, लहान अळया इत्यादी किडीवर उपजिविका करतात.


• कृषि माहिती वाहिनी : (02452) 229000 ई-मेल : deevnmkv@gmail.com • फोन : (02452) 228601
• विद्यापीठ संकेत स्थळ : www.vnmkv.ac.in विद्यापिठाच्या बातम्यांसाठी पहा www.promkvparbhani.blogspot.com /vnmkv /vnmkv /user/vnmkv


## ५ मे २०२३ — वैशाख/ज्येष्ठ शके १९४५

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| र रविवार | | वैशाख कृ. २ शुभ दिवस (रात्रौ ८.२१ प.) **७** | वैशाख कृ. १० शुभ दिवस (स. ६.३४ प) धर्मवीर संभाजी महाराज जयंती (तारखेप्रमाणे) **१४** | ज्येष्ठ शु. २ शुभ दिवस **२१** | ज्येष्ठ शु. ८ दुर्गाष्टमी स्वातंत्र्यवीर सावरकर जयंती **२८** |
| सो सोमवार | वैशाख शु. ११ मोहिनी एकादशी **महाराष्ट्र दिन मे दिन** आंतरराष्ट्रीय कामगार दिन **१** | वैशाख कृ. ३ **संकष्ट चतुर्थी** चंद्रोदय ०९.३२ रविंद्रनाथ टागोर जयंती जागतिक रेडक्रॉस दिन **८** | वैशाख कृ. ११ अपरा एकादशी **१५** | ज्येष्ठ शु. ३ शुभ दिवस महाराणा प्रताप जयंती (तिथीप्रमाण) **२२** | ज्येष्ठ शु. ९ शुभ दिवस **२९** |
| मं मंगळवार | वैशाख शु. १२ शुभ दिवस **२** | वैशाख कृ. ४ महाराणा प्रताप जयंती (तारखेप्रमाणे) **९** | वैशाख कृ. १२ शुभ दिवस **१६** | ज्येष्ठ शु. ४ विनायक चतुर्थी (अंगारक योग) **२३** | ज्येष्ठ शु. १० शुभ दिवस (रात्रौ ८.५३ प.) **३०** |
| बु बुधवार | वैशाख शु. १३ शुभ दिवस प्रदोष **३** | वैशाख कृ. ५ **१०** | वैशाख कृ. १३ प्रदोष शिवरात्री **१७** | ज्येष्ठ शु. ५ शुभ दिवस **२४** | ज्येष्ठ शु. ११ शुभ दिवस निर्जला एकादशी (रात्रौ ८.१३ नं.) अहिल्याबाई होळकर जयंती **३१** |
| गु गुरूवार | वैशाख शु. १४ शुभ दिवस श्री नृसिंह जयंती पौर्णिमा प्रारंभ रात्रौ ११.४३ **४** | वैशाख कृ. ६ शुभ दिवस (स.११.२७ प.) **११** | वैशाख कृ. १४ **खरीप शेतकरी मेळावा** **विद्यापीठ वर्धापन दिन** अमावास्या प्रारंभ रात्रौ ०९.४२ **१८** | ज्येष्ठ शु. ६ शुभ दिवस **२५** | |
| शु शुक्रवार | **वैशाख पौर्णिमा** **बुद्धपौर्णिमा**  पौर्णिमा समाप्ती रात्रौ ११.०३ **५** | वैशाख कृ. ७ शुभ दिवस कालाष्टमी **१२** | **वैशाख अमावास्या** दर्श अमावास्या अमावास्या समाप्ती रात्रौ ०९.२२ **१९** | ज्येष्ठ शु. ७ **२६** | |
| श शनिवार | वैशाख कृ. १ **६** | वैशाख कृ. ८/९ **१३** | ज्येष्ठ शु. १ ज्येष्ठ मासारंभ **२०** | ज्येष्ठ शु. ७ **२७** | |

### या महिन्यातील करावयाची कामे

- खरीप हंगामासाठी पुर्वमशागतीची कामे पूर्ण करावीत.
- उन्हाळी भुईमुग व सूर्यफुलाची वेळेवर काढणी करावी.
- खरीप हंगामासाठी बियाणे, खते, कीटकनाशके पेरणीपूर्व वेळेवर मिळण्याची तरतूद करावी.
- ऊसावरील खोडकिडीचा बंदोबस्त करावा.
- बोरीची छाटणी एप्रिलमध्ये केली नसल्यास मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात करावी.
- उन्हाळी पिकास पाण्याच्या पाळ्या एक आठवड्याच्या अंतराने द्याव्यात.
- जूनमध्ये कोरडवाहू मिरचीची लागवड करण्यासाठी (गादी वाफ्यावर) रोपे तयार करावीत. हळद व अद्रक या पिकाची लागवड करावी.
- हळद व अद्रक या पिकाची लागवड करावी.
- जमिनीचा मगदूर व हवामान विचारात घेऊन आडसाली, पूर्वहंगामी व सुरु ऊसास पाणी द्यावे. पाण्याची कमतरता असल्यास आच्छादनाचा वापर करावा तसेच एक सरी आड पाणी द्यावे.
- माती परीक्षणासाठी मातीचे शास्त्रशुद्ध पध्दतीने नमुने घेऊन ते मृद रसायन प्रयोगशाळेत पाठवावेत.
- पावसाळ्यात फळझाडे लावण्यासाठी खड्डे खोदावेत.
- हिरवळीच्या खतासाठी ताग पेरावा.
- मुरघासाचे खड्डे स्वच्छ करून घ्यावेत.
- लिंबु वर्गीय फळबागेत जमीनीच्या मगदुराप्रमाणे ३० ते ५५ दिवसाचा ताण सुरू करावा.
- झाडांना बोर्डोपेस्ट पावसाळ्यापुर्वी लावावे.

महत्त्वाच्या नोंदी



Mauli Shikshan Prasarak Mandal's

**College of Food Technology**

Affiliated to : Vasantrao Naik Marathwada Krishi Vidyapeeth, Parbhani 431 402

Near - Priyadarshani Sugar Factory, Loni Tq. Udgir 413 517 Dist. Latur (MS)

02385 - 231061 collegeoffoodtech.udgir@gmail.com



# सोयाबीन लागवड तंत्रज्ञान

मे २०२३

**डॉ. एस.पी. म्हेत्रे**
प्रभारी अधिकारी
मो. : ९४२१४६२२८२

**डॉ.आर.एस. जाधव**
सहाय्यक किटकशास्त्रज्ञ
मो.: ७५८८०५३९३९

अ.भा.स.सोयाबीन संशोधन योजना, व.ना.म.कृ.वि. परभणी

**यशस्वी सोयाबीन लागवडीसाठी आवश्यक बाबी :**

**१. जमीन :** सोयाबीन लागवडीसाठी मध्यम ते भारी, गाळाची, चांगला निचरा होणारी जमीन योग्य असते. जमिनीचा सामु ६.५ ते ७.५ च्या दरम्यान असणे जरुरीचे असते. लागवड जरी सर्व प्रकारच्या जमिनीत करता येत असली तरी अत्यंत हलकी, उथळ तसेच मुरमाड जमीन सोयाबीनच्या लागवडीसाठी योग्य नसते कारण त्या जमिनीत सोयाबीनचे अपेक्षित उत्पादन येत नाही. जास्त आम्लयुक्त, क्षारयुक्त तथा रेताड जमिनीत सोयाबीनचे पीक घेऊ नये. जमिनीत सेंद्रीय कर्बाची मात्रा चांगल्या प्रमाणात असली पाहिजे.

**२. हवामान :** सोयाबीनसाठी समशितोष्ण हवामान अनुकुल असते. तसेच ज्या भागात निचित योग्य पर्जन्यमान (७०० ते १००० मि मी) आहे अशा भगात हे पीक चांगले येते. सोयाबीनचे पीक जास्त उष्ण व जास्त थंड हवामानास संवेदनशील आसल्यामुळे हया पिकाची लागवड कोकण विभाग सोडुन सर्व भागात खरीप हंगामात करता येते. हे पीक तापमान व सुर्यप्रकाशाच्या कालावधी या दोन्हीला संवेदनशील आहे. पुर्ण पीक कालावधीत २५ ते ३५ अंश सेल्सियस तापमान असणे आवश्यक आहे. पीक उगवणीच्या काळात तापमान ३० अं सेल्सियस च्या आसपास तर फुलोऱ्याच्या काळात २२ ते २७ अं सेल्सियसच्या आसपास असावे. वरील हवमानाचा विचार केल्यास महाराष्ट्रात खरीप हंगामात असे हवामान उपलब्ध असल्यामुळे या पिकाची लागवड मोठया प्रमाणात खरीप हंगामात होते.

**३. वाण :** सोयाबीनच्या उत्पादनात स्थैर्य आणण्यासाठी दरवर्षी ३ ते ४ वाणांची लागवड करणे आवयक आहे. आपल्या विभागासाठी ज्या वाणांची शिफारस करण्यात आली आहे त्यातुन तीन-चार वाणांची निवड करुन बियाण्याची उपलब्धता पेरणी अगोदरच करुन ठेवावी. पेरणीसाठी किमान ७० टक्के उगवणक्षमता असलेले बियाणे आवश्यक आहे. पेरणीसाठी वनामकृवि, परभणीने विकसीत केलेल्या एमएयुएस ७१ (समृध्दी), एमएयुएस १५८, एमएयुएस १६२, एमएयुएस ६१२ इ. सुधारित वाणांचा तसेच महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरीने विकसीत केलेल्या डीएस २२८ (फुले कल्याणी), केडीएस ३४४ (फुले अग्रणी), केडीएस ७२६ (फुले संगम), डॉ.पी.डी.के.व्ही. अकोला यांनी विकसीत केलेल्या एएमएस १००१ (पीडीकेव्ही येल्लो गोल्ड), एएमएस १००-३९ (पीडीकेव्ही अंबा), जेएनकेकेव्ही, जबलपूरने विकसीत केलेल्या जेएस ३३५, जेएस ९३-०५, जेएस ९७-५२, जेएस २०-२९ व जेएस २०-११६, आघारकर संशोधन संस्था, पुणे यांनी विकसीत केलेल्या एमएसीएस ११८८, एमएसीएस १२८१ इ. वाणांचा वापर करावा.

**४. जमिनीची पूर्वमाागत :** जमिनीची २ ते ३ वर्षात किमान एकदा उन्हाळ्यामध्ये एक खोल (३० ते ४५ सेंमी.) नांगरणी करुन नांगरणीच्या विरुध्द दिोने वखराच्या २-३ पाळ्या देऊन जमीन समपातळीत करावी. शेवटच्या पाळीपूर्वी हेक्टरी २० गाडया (५ टन) शेणखत किंवा कंपोस्ट खत जमिनीत चांगले मिसळावे. शेणखतामुळे जमीन चांगली भुसभुशीत राहते व पिकाच्या मुळया खोलवर जाऊन पिकाची जोमदार वाढ होण्यास मदत होते.

**५. बीजप्रक्रिया, पेरणी, खते व आंतरमाागत :**

**बीजप्रक्रिया :** पाऊस जास्त प्रमाणात झाल्यास व आर्द्रतेचे प्रमाण वाढल्यास रोगांच्या वाढीसाठी अनुकूल स्थिती बनते. सोयाबीनवर विविध रोग येतात व त्यामुळे सोयाबीनचे मोठया प्रमाणावर नुकसान होते. रोग आल्यानंतर बुरशीनााकांची फवारणी घेण्यापेक्षा पेरणीपूर्वीच बीजप्रक्रिया केल्यास रोगांचे व्यवस्थापन व्यवस्थितरित्या होते. सोयाबीन बियाण्यास पेरणीपूर्वी मिश्र उत्पादन कार्बोक्झीन ३७.५ % अ थायरम ३७.५ % (व्यापारी नाव- वीटावैक्स पावर) (३.० ग्रॅम/ कि.ग्रॅ.) ची बीजप्रक्रिया करावी. या बीजप्रक्रियेमुळे सोयाबीनचे कॉलर रॉट, चारकोल रॉट व रोपावस्थेतील इतर रोगांपासून संरक्षण होते. तसेच मागील काही वर्षांपासून पिकाच्या सुरुवातीच्या अवस्थेत खोड माशीचा प्रादुर्भाव काही भागामध्ये आढळून येत आहे व मागील वर्षी उन्हाळी सोयाबीन बिजोत्पादन शेतकऱ्यांनी खुप मोठया प्रमाणावर घेतल्यामुळे खरीप २०२२-२३ मध्ये पिकाच्या सुरूवातीच्या अवस्थेत खोड माशीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे. त्यामुळे वरील बुरशीनाशकाच्या बिजप्रक्रियेनंतर थायमिथोक्झाम ३० % एफएस ची (१० मि.ली/ कि.ग्रॅ.) ची बीजप्रक्रिया करावी. वरील बुरशी/किटक नाशकांच्या बीजप्रक्रियेनंतर बियाण्यास रायझोबियम जीवाणू खत (ब्रेडी रायझोबियम) + स्फुरद विरघळविणारे जीवाणू खताची (पीएसबी) २५० ग्रॅम प्रती १० कि.ग्रॅ बियाण्यास प्रक्रिया करावी व नंतर सावलीमध्ये वाळवुन शक्य तेवढया लवकर पेरणी करावी. बीजप्रक्रियेसाठी वनामकृवि, परभणी निर्मित द्रवरुप जैविक खताचा (रायझोफॉस) सुध्दा १० मिली /१ कि.ग्रॅ. बियाणे या प्रमाणात उपयोग करता येतो.

**जैविक खताचे फायदे –** जीवाणू खतांच्या बीजप्रक्रियेमुळे संबंधीत रायझोबियम जीवाणू हवेतील नत्राचे स्थितीकरण करतात. त्यामुळे सोयाबीन पिकाच्या मुळांवरील गाठींची संख्या वाढते व पिकाला नायट्रोजन उपलब्ध होते तसेच पीएसबी जीवाणु पिकाला उपलब्ध न होणारा फॉस्फेट पिकाला वाढीच्या काळात उपलब्ध करून देतात.

**६. पेरणी :**

**पेरणीची वेळ –** सोयाबीनची पेरणी खरीप हंगामात पावसाला सुरुवात झाल्यानंतर १५ जून ते १५ जुलै पर्यंत व ७५ ते १०० मि.मी. पाऊस झाल्यानंतर जमिनीत पुरेसा ओलावा असल्याची खात्री करुनच करावी. १५ जुलै नंतर पेरणी केल्यास कीड व रोगाचा प्रादुर्भाव वाढण्याची व तसेच उत्पादनात घट येण्याची शक्यता असते.

**लागवडीचे अंतर व पध्दत :** सोयाबीनची पेरणी ४५ X ५ सें.मी. अंतरावर व २.५ ते ३.० से.मी. खोलीवर करावी. पेरणीच्या वेळेस बियाणे जास्त खोल पडल्यास व्यवस्थित उगवण होत नाही. पावसाच्या उशिरा आगमनामुळे पेरणीस विलंब झाल्यास सोयाबीनच्या हळव्या वाणांची लागवडीसाठी निवड करुन पेरणीसाठी प्रति हेक्टरी २५ टक्के जास्त बियाणे वापरावे व दोन ओळीतील अंतर ३० सें.मी. व दोन रोपातील अंतर ७.५ सें.मी. ठेवावे. हंगामात नेहमीपेक्षा जास्त पाऊस झाल्यास होणारा संभाव्य धोका टाळण्यासाठी सोयाबीनची पेरणी बीबीएफ यंत्राने करावी किंवा दर चार ओळीनंतर चर काढावेत.

**बीबीएफ (रूंद वरंबा सरी) पध्दतीचे फायदे :** बीबीएफ (रूंद वरंबा सरी) पध्दतीमुळे पावसाचे पाणी सऱ्यांमध्ये मुरते, त्यामुळे मुलस्थानी जलसंवर्धन होऊन त्याचा उभ्या पिकास, तसेच पुढील हंगामातील पिकास लाभ होतो. विशेषत: पावसाच्या दिर्घकालीन खंड काळात याचा लाभ होतो. अधिक पावसाच्या स्थितीत बीबीएफ पध्दतीमधील रुंद वरंब्यासोबतच्या दोन्ही बाजुकडील सऱ्यांमुळे अतिरीक्त पाण्याचा निचरा होण्यास मदत होते. गादी वाफे किंवा वरंब्यामध्ये हवा खेळती राहुन पाणी व हवा यांचे योग्य प्रमाण राखले जाते. परिणामी बियाण्याची उगवण चांगली होते. बीबीएफ पध्दतीमुळे पारंपारिक पध्दतीच्या (सपाट वाफे पध्दत) तुलनेत सरासरी २० ते २५ टक्के पर्यंत अधिक जलसंधारण होते तर २० ते २५ टक्के पर्यंत उत्पादनात वाढ शक्य होऊ शकते.

**बियाण्याचे प्रमाण :** सोयाबीन लागवडीसाठी हेक्टरी ६५ कि.ग्रॅ. बियाणे वापरावे. हेक्टरी झाडांची संख्या ४.४ ते ४.५ लाख ठेवावी. बियाण्याची उगवण क्षमता ७० टक्के असावी. आपण जर घरचेच बियाणे वापरत असाल व बियाण्याची उगवणक्षमता ७० टक्के पेक्षा कमी असेल तर त्यानुसार बियाण्याचे प्रमाण वाढवावे.

**बियाणाची उगवणशक्ती तपासणे :** शेतकऱ्याचे घरचे बियाणे असल्यास चार कुंडयांमध्ये/वाफयामध्ये/गोणपाटावर प्रत्येकी १०० बियाणे पेरणीपुर्वी टाकावे. त्याला दररोज थोडे थोडे पाणी दयावे व उगवण झाल्यानंतर अंकुर आलेल्या बियांची संख्या मोजुन त्याची उगवणशक्ती काढावी. म्हणजेच १०० पैकी जर ७० बिया उगवल्या तर त्या बियाण्याची उगवण शक्ती योग्य आहे असे समजावे.

**७. खते :**

**शेणखत/कंपोस्ट खत –** सोयाबीनसाठी हेक्टरी २० गाडया (५ टन) शेणखत किंवा कंपोस्ट खत शेवटच्या पाळीपूर्वी जमिनीत चांगले मिसळावे.

**रासायनिक खत –** सोयाबीनला हेक्टरी ३० कि.ग्रॅ. नत्र + ६० कि.ग्रॅ. स्फुरद + ३० कि.ग्रॅ. पालाश + २० कि.ग्रॅ. गंधक पेरणीच्या वेळेसच द्यावे. पेरणी करतेवेळी खते ही बियाण्याच्या खालीच पडतील व त्यांचा बियाण्याशी सरळ संपर्क येणार नाही याची काळजी घ्यावी. गंधकाचा वापर सोयाबीनसाठी अत्यंत आवश्यक आहे. त्याचप्रमाणे हेक्टरी २५ किलो झिंक सल्फेट आणि १० किग्रॅ बोरॅक्स द्यावे. या पिकास नत्र, स्फुरद, पालाश मॅग्नेशिअम, गंधक, कॅल्शियम, मॉलिब्डेनम, बोरॉन, लोह, जस्त व मॅगनीज ही अन्नद्रव्ये वाढीसाठी, फुलधारणेसाठी व शेंगात दाणे भरण्यासाठी आवश्यक असतात. पीक २० ते २५ दिवसाचे असतांना जर सुक्ष्म अन्नद्रव्यांच्या कमतरतेमुळे पिवळे पडल्यास सुक्ष्म अन्नद्रव्याची ५० मि.ली. प्रती १० लीटर पाण्यामध्ये टाकून फवारणी करावी. पीक शेंगा लागण्याच्या अवस्थेत असतांना १९:१९:१९ या विद्राव्ये रासायनिक खताची १०० ग्रॅम प्रती १० लीटर पाण्यामध्ये टाकून फवारणी करावी. तसेच शेंगा भरण्याच्या अवस्थेत असतांना ०:५२:३४ या विद्राव्ये रासायनिक खताची १०० ग्रॅम प्रती १० लीटर पाण्यामध्ये टाकून फवारणी करावी. पेरणीनंतर नत्रयुक्त खतांचा वापर टाळावा तसेच माती परिक्षण अहवालानुसार रासायनिक खतांची मात्रा कमी जास्त करावी. रासायनिक खते देण्यासाठी खालील पैकी कोणत्याही एका पर्यायाचा वापर करता येईल. (तक्ता क्र.१)

**८. आंतरमाागत :** तणे ही मुख्य पिकासोबत अन्नद्रव्ये, पाणी, वाढीसाठी आवश्यक जागा, सूर्यप्रकाश इ. साठी स्पर्धा करतात. याशिवाय ती सोयाबीनच्या विविध किडींसाठी आश्रयस्थाने बनतात त्यामुळे सोयाबीनचे पीक तणविरहीत ठेवणे आवश्यक आहे. सोयाबिन पिकामध्ये येणाऱ्या तणांचे योग्य वेळी नियंत्रण न केल्यास उत्पादनात सरासरी ३० ते ४०% पर्यंत घट येवु शकते. त्यामुळे पीक २० ते ३० दिवसांचे असताना दोन कोळपण्या/निंदणी व खुरपणी करुन शेत तणविरहीत ठेवावे. एकदा सोयाबीनला फुले लागली की कोळपणी करु नये अन्यथा सोयाबीनच्या मुळा तुटून नुकसान होते. पावसामुळे किंवा मजुरांच्या कमतरतेमुळे निंदणी/कोळपणी करणे शक्य नसल्यास तण नाशकाचा वापर करावा. यामध्ये पेरणीनंतर परंतु उगवणीपूर्वी डायक्लोसुलम ८४ % डब्लूडीजी (३० ग्रॅ./हे.), पेंडामिथॅलीन ३०% ई सी (२.५ ते ३.३ ली./हे.) मेटाक्लोर ५०% ई सी किंवा क्लोमाझोन ५०% ई सी (२.० ली./हे) ६००-७०० ली./हे पाण्यात टाकुन फवारावे किंवा पेरणीनंतर १५ ते २० दिवसांनी व तणे २ ते ४ पानांच्या अवस्थेत असताना क्लोरीम्युरॉन इथाईल २५% डब्ल्यू पी ३६ ग्रॅम/हेक्टर किंवा इमेझेथापायर १०% एस एल किंवा क्विजालोफाप इथाईल ५ % ई सी १.० ली./हेक्टर ची फवारणी करावी. तणनााकाची फवारणी फ्लॅट पॅन किंवा फ्लड जेट नोझल लावून ओलावा असलेल्या जमिनीवरच केली पाहिजे. तणे वाढल्यानंतर तणनााके फवारल्यास त्याचा अपेक्षित परिणाम दिसत नाही.

**९. पाण्याचे नियोजन :**

सोयाबीन या पिकाची पाण्याची एकुण गरज ५०० ते ६२५ मि. मि. एवढी असुन ही गरज खरीप हंगामातील नियमीत पाऊसमानाच्या भागात हे पीक घेतल्यामुळे पूर्ण होते. परंतु जर पाऊस पिकाच्या पूर्ण कालावधीत समप्रमाणात व पिकाच्या गरजेप्रमाणे झाला नाही किंवा १२ ते १५ दिवस किंवा त्यापेक्षा जास्त पाऊसाचा खंड पडला तर पिकाच्या वाढीवर व पर्यायाने उत्पादनावर विपरीत परिणाम होवुन उत्पादनात मोठी घट येण्याची शक्यता असते. सोयाबीनमध्ये रोप (२० ते २५ दिवस), फुलोऱ्याची (३५ ते ४५ दिवस) व शेंगा भरण्याची अवस्था (५५ ते ७५ दिवस) या पाण्याच्या ताणास संवेदनील असल्याने या कालावधीत १५ ते २० दिवसांची पावसाची उघडीप झाल्यास पिकास संरक्षित पाणी द्यावे. पाऊसाचा खंड पडल्यास पोटॅशिअम नायट्रेटच्या (१३:००:४५) दोन फवारण्या अनुक्रमे ३५ व्या व ५५ व्या दिवशी १०० ग्रॅम व २०० ग्रॅम प्रती १० लीटर पाण्यामध्ये टाकून फवारणी करावी. त्यामुळे पानातुन होणारे बाष्पीभवन कमी होऊन पीक कमी ओलाव्यात तग धरेल.

**१०. आंतरपीक/दुबार पीक पध्दती :** सोयाबीन पिकासोबत आंतरपिक म्हणुन इतर पिके घेतल्यास शेतकऱ्यांना आर्थिक फायदा तर होतोच परंतु त्याचबरोबर एखादे पीक नैसर्गिक आपत्तीमुळे हातचे गेल्यास आंतरपिकापासुन खात्रीशीर उत्पादनाची हमी राहते. संशोधनाद्वारे काही उपयुक्त व फायदेशिर सोयाबीन आंतरपिक पद्धती आढळुन आल्या आहेत जसे कोरडवाहू परिस्थीतीत सोयाबीन + तूर (२:१ किंवा ४:२) हे तर ओलीताखाली सोयाबीन + कापूस (१:१ किंवा २:१) हि आंतरपीक पध्दती फायदेशीर आढळून आली आहे. तसेच सोयाबीन आधारीत दुबार पीक पध्दतीत रब्बी ज्वारी किंवा करडई ही पीक पध्दती ओलीताखाली फायदेशीर आढळून आली आहे.

**११. पीक संरक्षण :** सोयाबीनमध्ये चक्रीभुंगा, खोडमाशी, पाने खाणाऱ्या अळया इ. महत्वाच्या किडी तर चारकोल रॉट, अल्टरनेरिया पानावरील ठिपके, शेंग करपा इ. महत्वाचे रोग आहेत. याशिवाय मावा, पांढरी माशी, तुडतुडे इ. किडींच्या प्रादुर्भावाबाबतीतही जागरुक राहून एकात्मिक कीड व रोग व्यवस्थापनाचा अवलंब करावा. किडीने/रोगाने आर्थिक नुकसानीची पातळी ओलांडल्यानंतर शिफारस केलेल्या किटकनाशक/ बुरशीनाशकाची फवारणी करावी.

**१२. काढणी व मळणी :** सोयाबीन पक्व झाल्यानंतर म्हणजे ८५ ते ९० टक्के पाने देठासह जमिनीवर गळुन पडल्यास व शेंगांचा रंग पिवळा ते काळसर झाल्यास पिकाची काढणी लवकर करणे फार महत्त्वाचे असते नाहीतर शेंगा तडकुन १५ ते २० टक्के उत्पादनात घट येण्याची शक्यता असते. पाऊसपाण्याचा अंदाज बघुन पिकाची काढणी धारदार कोयत्याने जमिनीलगत कापुन करावी. कापणी नंतर पिकाचे छोटे छोटे ढीग करुन २-३ दिवस उन्हात चांगले वाळु दयावे. सोयाबीन चे शक्यतो एकत्र मोठे ढीग किंवा गंजी करुन ठेवु नये. त्यामुळे त्यास बुरी लागुन धान्याची प्रत निकृष्ट होते. सोयाबीन पिकाची मळणी काठीने बडवुन, बैलाच्या पायाखाली, ट्रॅक्टरच्या चाकाखाली किंवा मळणी यंत्राद्वारे करता येते. मळणी करतांना बियाण्याच्या बाह्य आवरणाला ईजा पोहोचणार नाही याची काळजी घ्यावी. मळणी यंत्राने मळणी करावयाची असल्यास बियाण्यातील आर्द्रता १४ टक्के पर्यंत असेल तर मळणी यंत्राच्या फे-याची गती (आरपीएम) प्रती मिनीट ४०० ते ५०० फेरे इतकी ठेवावी. तर आर्द्रता १३ टक्के असेल तर ही गती ३०० ते ४०० फेरे प्रती मिनीट इतकी ठेवावी. मळणी यंत्र चालु असतांना अधुनमधुन मळणीयंत्रातुन पडणाऱ्या बियाण्याकडे लक्ष ठेवुन बियांची दाळ होण्याचे प्रमाण जास्त होत असल्याचे निदर्शनास आल्यास यंत्राच्या फे-यांची गती कमी करावी.

**१३. साठवण :** साठवण करण्यापुर्वी बियाणे २-३ दिवस उन्हामध्ये ताडपत्री/सिमेंटच्या खळयावर पातळ पसरुन चांगले वाळवावे व बियाण्यातील आर्द्रतेचे प्रमाण ९-१२ टक्के पर्यंत आणावे. वाळलेल्या बियाण्यातील शेंगा, फोलपटे, काडीकचरा, माती, खडे इ. काढुन ते स्वच्छ करावे. स्वच्छ केलेले बियाणे चांगल्या/नविन पोत्यात साठवून ठेवावे. सोयाबिनचे बियाणे हवेतील आर्द्रता लवकर शोषुन घेते त्यामुळे साठवणीचे ठिकाण थंड, ओलावारहित व हवेशीर असले पाहिजे. बियाणे १०० किलोच्या पोत्यामध्ये भरलेले असल्यास साठवणुक करताना चार पोत्यांपेक्षा जास्त व ४० किलोच्या पोत्यामध्ये भरलेले असल्यास ८ पोत्यांपेक्षा जास्त मोठी थप्पी लावु नये अन्यथा सर्वात खालच्या पोत्यातील बियाण्यावर जास्त वजन पडुन बियाणे फुटुन त्याची उगवणाक्ती कमी होते. पोत्यांची थप्पी जमिनीपासुन १० ते १५ सेंमी उंचीवर लाकडी फळयांवर लावावी. पोत्याची रचना आडव्या पद्धतीने करावी, म्हणजे हवा खेळती राहुन बियाण्याची गुणवत्ता व उगवणाक्ती जास्त काळ टिकण्यास मदत होते. आवश्यकतेनुसार बियाणे साठवण केलेल्या खोलीमध्ये कीटकनााक व बुरशीनाशकाचा वापर करावा तसेच उंदीरांचा उपद्रव टाळण्यासाठी आवश्यक ती काळजी घ्यावी. सोयाबीनच्या बियाण्याच्या पोत्यांची हाताळणी व वाहतुक काळजीपुर्वक करावी. पोती उंचावरुन आदळली जाणार नाही याची काळजी घ्यावी.

**उत्पादन :** सोयाबीन लागवडीच्या सुधारित तंत्रज्ञानाचा अवलंब केल्यास मध्यम ते भारी जमिनीत सोयाबीनचे हेक्टरी २५ ते ३० क्विंटल उत्पादन येऊ शकते.

**तक्ता क्रं.१ : सोयाबीनला रासायनिक खते देण्यासाठी विविध पर्याय**

| अ.क्र. | खते प्रति हेक्टरी |
|---|---|
| १ | युरिया (४० कि. ग्रॅ.) + मिश्रखते १०:२६:२६ (११५ कि.ग्रॅ.) + सिंगल सुपर फॉस्फेट (१८७.५ कि.ग्रॅ.) |
| २ | युरीया (१६.३० कि.ग्रॅ.) + मिश्रखते १२:३२:१६ (१८७.५ कि.ग्रॅ.) + गंधक (२० कि.ग्रॅ.) |
| ३ | युरीया (६५ कि.ग्रॅ.) + सिंगल सुपर फॉस्फेट (३७५ कि.ग्रॅ.) + म्युरेट ऑफ पोटॅश (५० कि.ग्रॅ.) |
| ४ | युरीया (१४.३४ कि.ग्रॅ.) + डाय अमोनियम फॉस्फेट (१३०.४ कि.ग्रॅ.) + म्युरेट ऑफ पोटॅश (५० कि.ग्रॅ.) + गंधक (२० कि.ग्रॅ.) |
| ५ | मिश्रखते १५:१५:१५ (२०० कि.ग्रॅ.) + सिंगल सुपर फॉस्फेट (१८७.५ कि.ग्रॅ.) |
| ६ | मिश्रखते १८:१८:१० (१६६ कि.ग्रॅ.) + सिंगल सुपर फॉस्फेट (१८७.५ कि.ग्रॅ.) + म्युरेट ऑफ पोटॅश (२२.३३ कि.ग्रॅ.) |